नवीन नियमित दिवाणी दावा क्र.९५६/२०२५.
जुना नियमित दिवाणी दावा क्र.९०३/२०२१.
सुधीर वि. माजीद व इतर
CNR NO.MHOS120011002025
निशाणी क्र.४२

| | |
|---|---|
| MHOS120011002025 | नवीन नियमित दिवाणी दावा क्र.९५६/२०२५<br>जुना नियमित दिवाणी दावा क्र.९०३/२०२१<br>सुधीर वि. माजीद व इतर<br>CNR NO. CNR NO.MHOS120011002025<br>निशाणी क्र.४२ |

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा शपथेवर सरतपास**

**नावः** अमृता अभिमान ढवळे

**वयः** २८ वर्षे, **व्यवसायः** दुय्यम निबंधक परांडा.

**रा.** परांडा, ता. भुम, जि. धाराशिव.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास विधिज्ञ श्री. बी. बी. मुंडे यांचेमार्फत शपथेवर सुरू :-**

**०१.** मी दिनांक ०३ ऑगस्ट २०२६ पासून परांडा येथे दुय्यम निबंधक म्हणून कार्यरत आहे. मला आता २७ जुलै १९७८ चे खरेदखताची साक्षांकित प्रत आता दाखविण्यात आली. ती आमचे कार्यालयात नोंदवली आहे. आमचे कार्यालयातील नोंदीप्रमाणे सदरचे खरेदीखत खरे व बरोबर आहे. सदर खरेदीखताचा क्रमांक ५३८/१९७८ असा आहे. सदर खरेदीखताप्रमाणे साहेबराव बोराडे व पदराज विधाते हे लिहून घेणारे आहेत व लिहून देणार म्हणून अब्दुल हसन बादेला, बशीर बादेला व मयुद्दीन बादेला हे आहेत.

**०२.** खरेदीखतामध्ये लिहून देणार यांची सही आहे. खरेदीखतास **निशाणी ४३** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील सदर खरेदीखताचे अनुषंगाने झालेला इंडेक्स उतारा दाखविण्यात आला.

त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ४४** देण्यात येते. सदरचा इंडेक्स उतारा आमचे कार्यालयाकडून देण्यात आला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एच. मोगल यांच्याकडून सुरू**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, आमचे कार्यालयात खरेदीखत केलेबाबतचे रजिस्टर १९७८ साली मेंटेन केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रजिस्टरची साक्षांकित प्रत कोणी मागितली तर ती त्या रजिस्टरवरून दिली जाते. सदरचे रजिस्टर मी आज सोबत आणले आहे. सदरचे रजिस्टर पाहून मी सांगते की, खरेदीखत निशाणी ४३ व इंडेक्स निशाणी ४४ मध्ये खरेदी देणार म्हणून अबुद हसन बादेला यांचे नाव नाही. सदर रजिस्टरचे संबंधित पानाची साक्षांकित प्रत मी न्यायालयात दाखल करू शकते. साक्षीदार परत सांगते की, निशाणी ४३ त्याची साक्षांकित प्रत आहे. मी आज सोबत त्याची साक्षांकित प्रत दाखल केली आहे ती निशाणी ४३/१ वर आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दिनांक – १८/०८/२०२६
ठिकाण – भूम

श्रवणोत्तर स्वीकृत

PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.08.18 16:51:50 +0530

**(श्रीमती पी.एस.जाधव)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, भूम.